# DEVELOPMENT OF PUBLIC ADMINISTRATION IN INDIA

## *Challenges and Solutions*



**Editors**

Dr. B. R. Katturwar

Dr. Urmila Reddy

Dr. Dattatraya Kharatmol

AnyScanner

PARIKALPANA
K-37, Ajit Vihar, Delhi-110084
Mo : 9968084132, 7982062594
e-mail : parikalpana.delhi2016@gmail.com

**Book** : Development of Public Administration in India
**Editors** : Dr. B. R. Katturwar, Dr. Urmila Reddy
Dr. Dattatraya Kharatmol

© Editors

**Edition** : 2024

**Price** : 795/-

**ISBN** : 978-93-95104-98-2

---

Printed at Compact Printers, Delhi-110 032 in India.

*To publish this book by any means and to perform theatrical it is mandatory to get written permission from the publisher.*

AnyScanner

59. माहितीचा अधिकार 326
*– डॉ. सय्यद कुरेशाबी नजीरसाब*
60. लोकप्रशासन आणि मानवी अधिकार 331
*– डॉ. नागनाथ वैजनाथ शेवाळे*
61. भारतातील सुशासन यंत्रणेचा एक चिकित्सक अभ्यास 334
*– स्फुर्ती समुद्रे*
62. प्रशासकीय पारदर्शक कामकाज अंमजबजावणीत माहिती अधिकार अधिनियम 2005 भूमिका *– शिवाजी धोंडीबा चांदणे* 336
63. भारतातील सायबर सुरक्षा 342
*– प्रा. आश्विनी अंगद धायगुडे*
64. स्वातंत्र्योत्तर प्रशासकीय सुधारणा एक अभ्यास 346
*– डॉ. रमेश वाघमारे*
65. सुशासन निर्माणमें बाधाएँ 351
*– डॉ. वितेश भारत निकते*
66. लोकप्रशासनाची सर्वसमावेशकता आणि वुड्रो विल्सन 357
*– डॉ. गीता गिरवलकर*
67. भारताची सुशासनाकडे वाटचाल 360
*– डॉ. अजय बी. पाटील*
68. ई-न्यायालय ही काळाची गरज 364
*– डॉ. विजयकुमार मेकेवाड*
69. डिजिटल साक्षरता ही काळाची गरज 367
*– प्रा. डॉ. बाळू कांबळे*
70. एक अध्ययन विषय के रूप में लोक प्रशासन का विकास 372
*– डॉ. भानूप्रिया त्रिवेदी*
71. भारतीय प्रशासनासमोरील आव्हाने 378
*– डॉ.बी.आर.कतुरवार*
72. भारतीय प्रशासानासामोरील आव्हाने 381
*– श्री.पवार शरद सुर्यकांत*
73. भारतीय माहितीचा अधिकार कायद्याच्या मर्यादा 385
*– डॉ. विठ्ठल सांडूर*
74. तुलनात्मक प्रशासनाच्या संशोधनापुधील समस्या 389
*– प्रा. डॉ. उर्मिला गोविंद रेड्डी*

AnyScanner

# 73. भारतीय माहितीचा अधिकार कायद्याच्या मर्यादा

**डॉ. विठ्ठल सांडूर**
*महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा*

भारतीय संविधानात व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी व कार्यकारी मंडळाप्रमाणे कायदेमंडळावरही नियंत्रण असावे म्हणून मुलभूत हक्काचा संविधानातील कलम 12 ते 35 मध्ये लिखीत स्वरूपात उल्लेख केला आहे. तो घटनेचा एक भाग म्हणून मान्य केला आहे. लोकशाही, गणराज्य, सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता व समाजवाद ह्या तत्वाचा स्वीकार करून सर्वांना समान संधी व दर्जा, न्याय, स्वातंत्र्य, समता मान्य केली आहे. यासाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. ज्या हक्काबाबत सुरक्षित हक्क म्हणून हमी देणे शक्य होते ते हक्क मुलभूत हक्क म्हणून स्वीकारण्यात आले व इतर मानवी हक्काचा समावेश संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये करण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकात भारतापुढील उदिष्टे स्पष्टपणे सांगितली आहेत. राज्यघटनेच्या कलम 19 मध्ये भारताच्या सगळ्या नागरिकांना विचाराचे प्रकटीकरण करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. या कलमाकडे काळजीपुर्वक बघितले तर असे लक्षात येते की, त्या विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची व्याप्ती फार मोठी आहे. माहिती अधिकाराचा उगम भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मुलभूत हक्कामध्ये आहे. पारदर्शकता आणि जबाबदारी हे सुशासनाचे महत्वाचे दोन स्तंभ आहेत. पारदर्शकता आणि जबाबदारी साध्य करण्यासाठी माहितीचा अधिकार हा अत्यंत महत्वाचा पैलू आहे. शाश्वत मानवी प्रगती साधण्यासाठी या ध्येयाच्या दिशेने कार्य केले पाहिजे. शासन लोकांसाठी असल्यामुळे त्याचे कामकाज खुले असावे तसेच ते जबाबदार असावे आणि ते ज्यांचे प्रतिनिधित्व करते त्या लोकांपासून लपवण्यासारखे त्यांच्याकडे काहीही नसावे ही माहिती अधिकारामागची मुलभूत कल्पना आहे. परंतू स्वातंत्र्यानंतरच्या 64 वर्षात यासाठी फारसे प्रयत्न झाले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ब्रिटिश राजवटीतील प्रशासकीय चौकटीचा स्विकार केला. 1923 मध्ये सर्वसामान्य भारतीयांना सरकारच्या कामकाजाची माहिती मिळू नये यासाठी Official Secrets Act केला होता. शासनकर्ते बदलले परंतु या कायद्यात बदल न होता तो कायदा स्वातंत्र्यानंतरच्या काळात तसाच कायम ठेवण्यात आल्यामुळे जनतेला त्यांचे मुलभूत स्वातंत्र्य उपभोगता आले नाही. यामुळे

प्रशासनात गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले.

लोकशाहीत जनता सार्वभौम आहे. यामुळे जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. या हेतूने घटनाकारांनी सर्वसामान्यांना माहिती मिळवण्याचा अधिकार देण्यासाठी मुलभूत तरतुदी घटनेत केल्या आहेत व या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णयही महत्वाचे आहेत. उदा. 1975 मधील उत्तर प्रदेश वि राजनारायण खटला, 1981 मधील एस.पी. गुप्ता वि भारत सरकार, 1982 चा निकाल, 1995 मध्ये माहिती व प्रसारण मंत्रालय वि क्रिकेट असोशिएशन ऑफ बंगाल, 1997 मध्ये दिनेश द्विवेदी विरुद्ध भारत सरकार सेक्रेटरी या सर्व प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सर्वच निर्णयात माहिती अधिकाराची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. त्यानुसार भारतातील विविध राज्यांनी (उदा-तामिळनाडू, गोवा 1997, राजस्थान 2000, दिल्ली 2001, महाराष्ट्र 2002. मध्यप्रदेश 2003) व 2005 मध्ये केंद्र शासनाने माहिती अधिकार अधिनियम तयार केला देव खऱ्या अर्थाने लोकशाही शासन जनतेसाठी आहे हे सिद्ध केले.

माहिती अधिकार मिळावा अशी मागणी भारतातच केली गेली नाही तर यापूर्वी म्हणजे 246 वर्षापुर्वी 1766 मध्ये स्वीडनमध्ये लागू झाला. 1951 मध्ये फिनलॅण्ड, 1966 मध्ये अमेरिका, 1970 मध्ये नार्वे, 1978 फ्रान्स, 1982 ऑस्ट्रेलिया, 1983 कॅनडा, 1985 डेन्मार्क, 1999 जपान, 2000 इंग्लंड, 2002 मध्ये पाकिस्तानामध्ये तेथील नागरिकांना माहितीचा अधिकार मिळाला. जगातील सर्वच राष्ट्रामध्ये माहितीचा अधिकार जनतेला मिळाला पाहिजे यासाठी 10 ते 12 डिसेंबर 2003 रोजी जिनेव्हा येथे व 16 ते 18 नोव्हेंबर 2005 रोजी प्यूनिसला जागतिक शिखर परिषद घेण्यात आली. त्यात जगातील सगळ्या देशामध्ये माहितीच्या स्वातंत्र्याचा अधिकार नागरिकांना देणारे कायदे करावेत व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणारी उपाययोजना करण्याची चर्चा झाली. जनतेला शासकीय निर्णय व कामकाजाच्या संदर्भात संपुर्ण व खरीखुरी माहिती मिळाली पाहिजे व जनतेचा अधिकार आहे असा विचार केवळ भारतातच झाला नाही तर तो विचार सर्वच राष्ट्रात होताना दिसून येतो.

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम 2005** : संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रपतीनी 15 जून 2005 रोजी या विधेयकाला संमती दिली. यानंतर केंद्रीय विधी व न्याय मंत्रलयाने हा कायदा 21 जून 2005 रोजी राजपत्रत प्रसिद्ध केला व 12 ऑक्टोबर 2005 पासून हा कायदा लागू झाला. या कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना लोकसभा व विधानसभा सदस्याएवढे अधिकार प्राप्त झाले आहेत. माहिती अधिकार कायदा 2005 मधील ठळक तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

—माहिती अधिकार ही सामान्य भारतीय नागरिकांच्या लोकशाही हक्काची सनद आहे. 'जनतेच्या लोकशाही स्वातंत्र्याची हमी या कायद्यात आहे'.

—सर्व नागरिकांना माहिती मागण्याचा अधिकार आहे.

—नागरिक व प्रामाणिक अधिकाऱ्यांना या कायद्याने त्याचे काम कोणाच्याही

दबावाला बळी न पडता करता येईल.

—संसदेला व विधीमंडळाला जी माहिती दिली जाते ती सर्व माहिती मिळवता येईल. सामाजिक व विकास विषयक नोंदीही जनतेला खुल्या असतील.

—शासकीय यंत्रणा भ्रष्टाचारमुक्त व्हावी जबाबदारी निश्चित केली आहे.

—माहिती विहीत मुदतीत द्यावी किंवा सकारण नाकारावी.

—अर्जदारास लिहता येत नसेल तर तोंडी विनंतीनुसार स्वतः नमुद करून घ्यावे तसेच अपंगास विशेष सहाय्य देण्यात यावे.

—दारिद्ररेषेखालील नागरिकाला ही माहिती विनामुल्य देण्याची तरतुद आहे.

—त्रयस्थ व्यक्ती व संस्थासंबंधी माहिती देतांना जनहित विचारात घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

—विहित मुदतीत माहिती न दिल्यास प्रत्येक दिवसाला 250/- प्रमाणे दंड, जास्तीत जास्त दंड रु. 25000/-त्याशिवाय खातेनिहाय चौकशीही होऊ शकते.

—दंड लावण्याचा अधिकार दुसऱ्या ॲपिलेट अँथोरिटीला आहे. माहिती अधिकाऱ्याला दंड लावण्यापुर्वी नैसर्गिक न्यायाच्या उद्देशने त्या अधिकाऱ्याला त्याची भूमिका मांडण्याची संधी या कायद्यात आहे.

**माहिती मिळवण्याची कार्यपद्धती :** खात्याने नियुक्त केलेले माहिती अधिकारी त्यांना आवश्यक असलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याची मदत घेऊ शकतात. त्यांचीही जबाबदारी अधिकाऱ्याएवढीच आहे.

विहित मुदतीत माहिती न दिल्यास माहिती नाकारली असे समजले जाईल. स्वतःकडे उपलब्ध असलेली माहिती प्रथम देऊन अन्य ठिकाणी असलेली उर्वरित माहिती मागवून द्यावी लागेल.

महिती नाकारताना कारण द्यावे लागेल (अपिल कुणाकडे करावे त्या तपशीलासह) दुसरे अपिल मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे करता येते. ते फक्त अपिलीय अधिकारी नसून ते या कायद्याचे प्रशासकही आहेत. त्यांच्याकडे तक्रारी व सुचनाही करता येतील.

या कायद्यानुसार चांगल्या उद्देशाने केलेल्या कामकाजासंबंधात खटला भरता येणार नाही. हा कायदा शासकीय/निमशासकीय कार्यालये/जिल्हा परिषदा/नगरपालिका/ महानगरपालिका तसेच ज्यांना शासनाकडून आर्थिक व अन्य भरीव मदत दिली जाते त्या सर्वांना लागू आहे. सर्व माहिती अधिकाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देणे शासनावर बंधनकारक आहे. माहितीच्या एका झेरॉक्स पृष्ठासाठी 2 /-घ्यावयाचे आहेत. (अधिक टपाल खर्च) माहितीची किंमत निश्चित केली असेल तर तेवढी किंमत (प्लॉफी/ डिस्केट रू.50 ) पहिल्या अपिलासाठी 30 दिवस मुदत तर दुसऱ्या अपिलासाठी 90 दिवस (शुल्क 20/-)

अशा प्रकारे भारतातील प्रत्येक नागरिकाला माहिती मिळवण्याचा अधिकार

माहिती अधिकार कायदा 2005 नुसार मिळाला आहे. यामुळे जनतेला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याची हमी मिळाली आहे. मानवी हक्काच्या दृष्टीकोनातून या माहिती अधिकाराला महत्व प्राप्त झाले आहे.

**माहितीचा अधिकार कायद्याच्या मर्यादा :** एखाद्या सार्वजनिक संस्थेची साधनसंपत्ती व्यस्त प्रमाणात अन्यत्र वळविली जाण्यासंबंधिची माहिती किंवा संबंधित नोंदीच्या सुरक्षिततेसाठी व जतनासाठी नुकसानकारक असेल अशी माहिती देण्यास कलम 7 (9) अन्वये अपवाद केला आहे. तर कलम 8 हि माहिती उघड करण्यावर काही मर्यादा घालण्यात आल्या आहेत. देशाच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला हानी पोहचत असेल. एखाद्या न्यायालयाने किंवा लवादाने प्रतिबंध घातला असेल किंवा जी माहिती दिल्याने न्यायालयाचे अवमान होणार असेल. एखाद्या व्यक्तीच्या जीवीताला किंवा शारीरिक सुरक्षिततेला धोकादायक ठरत असेल किंवा कायद्याची अंमलबजावणी किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव गुप्त माहितीचा किंवा सहाय्याचा खोत उपड करत असेल. गुन्हयाच्या तपासात अडथळा आणू शकेल किंवा गुन्हेगाराविरुद्ध खटला भरण्या अडथळा येत असेल. मंत्रिमंडळाची कागदपत्रों ज्या घटना माहितीसाठी केलेल्या विनंती अर्जाच्या तारखेच्या वीस वर्षांआधी घडून गेल्या आहेत अशा घटनांची माहिती. याशिवाय अन्य काही अपवादही आहेत. गुप्त माहिती जमवणाऱ्या संस्था व संरक्षण संस्था यांना या कायद्याच्या व्याप्तीतून वगळण्यात आले आहे हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. असे असले तरी या कायद्यात अशी तरतुद आहे की, माहितीची मागणी भ्रष्टाचाराच्या आरोपाबाबत किंवा मानवी हक्कावरील अतिक्रमणाबदल असेल तर हा कायदा वरील संस्थानासुद्धा लागू होतो.

**साराश :** 21 व्या शतकातील भारताचे सामर्थ्य फक्त जीडीपी वरून मोजता येणार नाही. गरिबातल्या गरीब माणसाला शासनाकडून मुलभूत सुविधा किती प्रमाणात पुरविल्या जातात त्यावरून त्या राष्ट्राचा दर्जा ठरत असल्याने शासकीय कार्यक्रम, प्रकल्प, योजना, विविध उपक्रमासाठी मिळालेला निधी जमा असलेली रक्कम यासंबंधीचा तपशील लोकांना कळेल अशा पद्धतीने प्रसिद्ध केल्याने लोकांमध्ये जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली आहे. लोकांना माहिती अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध झाल्यामुळे स्थानिक शासनसंस्थामध्ये जबाबदारीची जाणीव आणि पारदर्शकता निर्माण झाली आहे. कायद्याचे राज्य ही संकल्पना मागील दशकात मोडीत निघाली होती परंतू या कायद्यामुळे प्रशासन व्यवस्थेत कायद्याचे राज्य निर्माण होवून राजकीय सुधारणाला अर्थपुर्णता प्राप्त झाली आहे.

## संदर्भ


1. सोनवणे जगतराव, सरकारी कर्मचारी आणि माहितीचा अधिकार कायदा, सोनदिपा पब्लिशर्स
2. माहितीचा अधिकार अधिनियम 2005, विवेकानंद प्रकाशन पुणे
3. भालेराव जे.के., जगताप बी.जी., प्रगत लोकप्रशासन, अनुराधा प्रकाशन, पैठण
4. लोकराज्य मे 2007